MHAH220007682020

नियमित दिवाणी दावा क्र.११८/२०२०
संजय वि. कैलास व इतर

आदेश
(नि.क्र.७४ खाली)

प्रस्तुतचा अर्ज वादीतर्फे दिवाणी प्रक्रिया संहितेच्या ऑर्डर ६ रुल १७ प्रमाणे दावा दुरुस्तीकामी दाखल केला आहे.

२. अर्ज व अर्जावरील म्हणणे वाचले. संपुर्ण अभिलेखाचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

३. अर्जदार/वादीचे थोडक्यात कथन असे आहे की, सदरचा दावा वादीने दावा कलम १अ या मिळकतीमध्ये अतिक्रमणकरु नये व स.नं. ४३/२अ या वादी यांचे जमिनीमध्ये हरकत अडथळा करु नये यासाठी प्रतिवादी क्र. १ ते ६ विरुध्द निरंतर मनाई हुकूम मिळणेसाठी दाखल केला आहे. सदर दाव्यामध्ये प्रतिवादी क्र. ६ व ८ हे मयत झालेमुळे वादी यांनी नि.क्र.६१ चा अर्ज वारस रेकॉर्डवर घेणेसाठी दिलेला आहे. त्यावर वारसांना नोटीस काढणेचा कोर्टाचा आदेश झालेला आहे. त्यानंतर काही वारस कोर्टात हजर झालेले आहे. नियोजीत प्रतिवादी क्र. ८ब सरस्वती पोपट टकले हिची बजावणी राहिलेली आहे. तिच्या नवऱ्याचे नाव पोपट ऐवजी तुकाराम असल्यामुळे नोटीस न घेता परत आलेले आहे. त्यामुळे नि.क्र.६१ वरील अर्जामध्ये ८ब चे नवऱ्याचे नाव नोपट ऐवजी तुकाराम अशी दुरुस्ती करण्याची वादीने विनंती केली आहे. वादीने पुढे असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र. ९ बाबा रखमाजी टकले हे मयत झालेले आहेत. त्यानंतर प्रतिवादी क्र. ९ ची पत्नी द्रोपती ही सुध्दा मयत झालेली आहे. प्रतिवादी क्र. ९ चे वारस प्रतिवादी क्र. १, २ हे दाव्यामध्ये सामाविष्ट आहेत. त्यामुळे प्रतिवादी क्र. ९ चे वारस दाव्यामध्ये स्वतंत्रपणे घेण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र. ९ चे नाव दाव्यातून कमी करण्याची वादीने विनंती केली आहे व त्यानुसार दाव्यात दुरुस्ती करण्याची परवानगी वादीने मागितली आहे.

४. प्रतिवादी क्र. २, ८ व ९ तर्फे वकीलांनी सदर अर्जावर म्हणणे दिले आहे व असे कथन केले आहे की, सदर वादीचा अर्ज कायदेशीर नसुन वादीने यापुर्वी दाव्यात दुरुस्ती केलेली आहे. सदर दुरुस्तीमध्ये दुरुस्त करण्याची तरतुद नाही.

त्यामुळे सदर वादीचा अर्ज खर्चासह नामंजुर करण्यात यावा अशी प्रतिवादी क्र. २, ८ व ९ यांनी विनंती केली आहे.

५. संपुर्ण अभिलेखाचे अवलोकन केले. नि.क्र.६१ वरील दस्ताचे अवलोकन केले असता सदरचा दस्त हे नि.क्र.६० च्या अर्जाचे प्रतिज्ञापत्र असल्याचे दिसुन येत आहे. नि.क्र.६१ हा वादीने अर्जात कथन केल्याप्रमाणे वारस रेकॉर्डवर घेण्याचा अर्ज नाही व सदर नि.क्र.६१ वर वारसांना नोटीस काढणे असा आदेश झाल्याचे दिसुन येत नाही. वादीने अभिलेख न पाहता सदरचा अर्ज दिल्याचे दिसुन येत आहे. तसेच वादीचे असे म्हणणे आहे की, प्रतिवादी क्र. ९ हा मयत झाला आहे व त्याचे नाव प्रतिवादीपणातून कमी करण्यात यावे. परंतु युक्तीवादादरम्यान वादीच्या विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला की, सदर प्रतिवादी क्र. ९ च्या नावाला मयत म्हणुन कंस नि.क्र.१ वर करण्यात यावा. एकंदरीत वादीने सदरचा अर्ज अभिलेखाची काळजीपुर्वक न पाहता दिल्याचे दिसून येत आहे. नि.क्र.६१ हा दावा दुरुस्तीचा अर्ज नसुन शपथपत्र आहे. त्यामुळे मोघम दिलेला अर्ज मंजुर करता येणार नाही. म्हणुन सदरचा अर्ज दफ्तरी दाखल करुन घेण्यात येत आहे. वादीने योग्य ती तजवीज करावी. वादीने मोघम स्वरुपाचा सदरचा अर्ज दिल्यामुळे प्रतिवादी यांचे नुकसान झाले आहे त्याबद्दल वादीने प्रतिवादीला रुपये ३००/-(तीनशे रुपये मात्र) खर्च द्यावा.

RAMRAO BABURAO RAUT

Digitally signed by RAMRAO BABURAO RAUT
Date: 2026.01.07 17:18:34 +0530

(आर. बी. राऊत)
२रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
कर्जत, जि. अहमदनगर.

स्थळ : कर्जत.
दिनांक :०७/०१/२०२६.